2024 पर्यंत सुधारित



# A Regulation to provide for the formal recognition of heirs, executors and administrators, and for the appointment of administrators and managers of property by the Courts.

## (BOMBAY REGULATION VIII OF 1827.)

## न्यायालयांनी मालमत्तेच्या वारसांना मृत्युपत्र, व्यवस्थापकांना आणि प्रबंधकांना यथानियम मान्यता देण्याबाबत आणि प्रबंधकांची व व्यवस्थापकांची नेमणूक करण्यासंबंधीं तरतुद करण्याबाबत विनियम.

---

### अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

| कलमें. | | पृष्ठ |
|---|---|---|
| | **विभाग १.** | |
| | सूक्ष्म असेल दानेदार त्याबाबतींत, वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक आणि प्रबंधक यांना मान्यता देण्याविषयीं नियम. | |
| १. | मृत इसमाचा प्रतिनिधि होण्यास त्याचा वैध वारस इत्यादि सक्षम होत. त्यासाठीं न्यायालयाच्या मान्यतेची आवश्यकता नाहीं. | २१ |
| २-एक. | परंतु अशी मान्यता देण्यासंबंधीं विनंती करण्यांत आल्यास घोषणापत्रक काढण्यांत येईल. | २२ |
| २-दोन. | घोषणापत्रकास प्रसिद्धि देणें ... ... ... ... | २२ |
| ३. | हरकत न घेण्यांत आल्यास मान्यता देणें ... ... ... | २२ |
| ४-एक. | जी कोणतीहि हरकत घेण्यांत येईल तिची तपासणी करणें आणि त्याप्रमाणें मान्यता देणें किंवा नाकारणें. | २२ |
| ४-दोन. | प्रश्न गुंतागुंतीचा किंवा अवघड असेल तर, बाब न्याय-निर्णयासाठीं सोंपविणें | २२ |
| ५. | मृत्युपत्रांच्या आणि मान्यतांच्या खरेंपणाबद्दल प्रमाणपत्र कसें द्यावें ... | २३ |
| ६. | रद्द केलें. ... ... ... ... ... | २३ |
| ७-एक. | मान्यताप्राप्त वारस इत्यादि मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सक्षम असणें | २३ |
| ७-दोन. | परंतु मान्यतेमुळें मालमत्तेवरील मालकीहक्क मिळणार नाहीं ... | २३ |
| ७-तीन. | तसेंच दावेदारांस जबाबदार असण्याच्या अटींतून मुक्तता होत नाहीं ... | २३ |
| ८. | मान्यतेस नकार म्हणजे अर्जदारांच्या दाव्याविरुद्ध निर्णय नव्हे ... | २३ |
| | **विभाग २.** | |
| | कबजा घेण्यास सक्षम असलेला आणि तसें करण्यास राजी असलेला वारस किंवा मृत्युपत्रव्यवस्थापक नसेल त्याबाबतींत, जिल्हा न्यायालयानें करावयाच्या प्रबंधकाच्या नेमणुकीविषयीं. | |
| ९. | वारस इत्यादि होण्यास पात्र इसम असतील परंतु वारस इत्यादि कोण त्याचा निर्णय झालेला नसेल किंवा वारस अक्षम असतील असे प्रसंग न्यायाधिशास अशा प्रसंगीं प्रबंधकाची नेमणूक करतां येईल परंतु निकडीचा प्रसंग संपल्यावर उक्त प्रबंधक जबाबदार असेल. | २३ |

| कलमें | | पृष्ठ |
|---|---|---|
| १०-एक. | वारस इत्यादि हे माहित नसतील तर प्रबंधकांची नेमणूक करण्यांत यावी व घोषणापत्रक काढण्यांत व प्रसिद्ध करण्यांत यावे. | २४ |
| १०-दोन. | .. .. .. .. .. .. .. | २४ |
| १०-तीन. | वारस इत्यादि म्हणून आढळून येणाऱ्या इसमांना कबजा देणें ... | २४ |
| १०-चार. | कोणीहि वारस हजर न झाल्यास, प्रकरण सदर दिवाणी अदालतीकडे पाठविणें. अदालतीनें मुदत देणें किंवा विक्री करण्याविषयीं विक्रीचें उत्पन्न अनामत ठेवण्याविषयीं आदेश देणें. | २४ |
| ११. | न्यायालयानें नेमलेल्या प्रबंधकांनीं तारण देणें. न्यायाधिशाच्या स्वविवेकानुसार, त्यांना पारिश्रमिक देणें. | २५ |
| | परिशिष्टें ... ... ... ... ... ... | २५ |

# सन १८२७ चा मुंबई विनियम ८.*

## न्यायालयांनी मालमत्तेच्या वारसांना, मृत्युपत्रव्यवस्थापकांना आणि प्रबंधकांना यथानियम मान्यता देण्याबाबत आणि प्रबंधकांची व व्यवस्थापकांची नेमणूक करण्यासंबंधीं तरतूद करण्याबाबत विनियम.

[१ जानेवारी १८२७]

हा विनियम सन १८७३ चा अधिनियम १२ याअन्वयें अंशतः रद्द करण्यांत आला.

कलम १० चा अंमल सन १८९० चा मुंबई अधिनियम ४, कलम ५८ (३) अन्वयें स्थानिक क्षेत्रापुरता मर्यादित करण्यांत आला.

ह्या विनियमांत पुढील आदेशांअन्वयें अनूकूलन व रूपभेद करण्यांत आले :—

भारतीय विधि अनूकूलन परिषद आदेश.

विधि अनूकूलन आदेश, १९५०.

ज्याअर्थीं, मृत इसमाच्या वारसांना, मृत्युपत्रव्यवस्थापकांना किंवा वैध प्रबंधकांना, त्यांच्या हक्कांविषयीं वाद नसेल तर, भूसम्पत्तीपैकीं असलेल्या मालमत्तेची व्यवस्था हातीं घेण्याची किंवा ती मालमत्ता परत मिळविण्यासाठीं दावा करण्याची परवानगी असावी व त्यांत न्यायालयांनीं हस्तक्षेप करुं नये हें सामान्यपणें इष्ट आहे. तरीहि, ज्याअर्थीं, असे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक यांनीं भूसम्पत्तीचा कबजा ज्यांच्याकडे आहे किंवा जे उक्त भूसंपत्तीचे ऋणको आहेत त्या इसमांनी, त्यांस मान्यता देण्याच्या व त्यांच्याशीं व्यवहार करण्याच्या बाबतींत त्यांना खात्री वाटावी म्हणून आपण वारस असल्याबद्दल, मृत्युपत्रव्यवस्थापक असल्याबद्दल किंवा प्रबंधक असल्याबद्दल जिल्हा न्यायालयांतून प्रमाणपत्र मिळविणें कांहीं बाबतींत आवश्यक किंवा सोयीस्कर आहे ; प्रस्तावन

आणि ज्याअर्थीं, मृत इसमाच्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असलेला किंवा असा ताबा घेण्यास राजी असलेला कोणीहि इसम त्याच वेळीं नसेल किंवा दोन किंवा अधिक दावेदारांमध्यें वारसाहक्कासंबंधीं किंवा उत्तराधिकार मिळण्याच्या हक्कासंबंधीं वाद असेल आणि त्यांच्यापैकीं कोणीहि मालमत्तेचा कबजा घेतलेला नसेल किंवा वारस आपल्या कामकाजाची व्यवस्था पाहण्यास अक्षम असेल आणि त्यांच्या वतीनें मालमत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असलेले आणि तो घेण्यास राजी असलेले कोणीहि जवळचे नातेवाईक त्यांना नसतील किंवा मालमत्ता असलेला एखादा इसम मृत्युपत्र न करतां मरण पावेल आणि त्याच्या वारसांविषयीं माहिती मिळत नसेल तेव्हां तेव्हां भूसम्पत्तीची व्यवस्था पाहण्यासाठीं जिल्हा न्यायालयानें प्रबंधकाची नेमणूक करणें आवश्यक आहे, त्याअर्थीं, पुढील नियम करण्यांत आले आहेत.

### विभाग १.

### सक्षम दावेदार असेल त्याबाबतींत, वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक आणि प्रबंधक यांना मान्यता देण्याविषयीं नियम.

१. जंगम किंवा स्थावर मालमत्ता मागे ठेवून एखादा इसम मरण पावेल तेव्हां त्याच्या वारसास मृत्युपत्रव्यवस्थापकास किंवा वैध प्रबंधकास मालमत्तेची व्यवस्था स्वतःकडे घेण्याचा अधिकार आहे किंवा उक्त मालमत्ता परत मिळण्यासाठीं दावा लावण्याचा अधिकार आहे. मात्र व्यवस्था स्वतःकडे घेणें किंवा मालमत्ता परत मिळण्यासाठीं दावा लावणें हें, उक्त मालमत्तेची विल्हेवाट लावण्याबाबत लागू असलेल्या विधीनुसार किंवा वहिवाटीनुसार असलें पाहिजे. त्यासाठीं, न्यायालयाकडून यथानियम मान्यता मिळण्यासाठीं न्यायालयाकडे आगाऊ अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाहीं.

मृत इसमाचा प्रतिनिधि होण्यास त्याचा वैध वारस इत्यादि सक्षम होत. त्यासाठीं न्यायालयाच्या मान्यतेची आवश्यकता नाहीं.

---

*दिनांक १ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

*परंतु अशी मान्यता देण्यासंबंधीं विनंती करण्यास आल्यास घोषणापत्रक काढण्यांत येईल.*

२-एक अेक भूसम्पत्तीचा कबजा ज्याच्याकडे आहे किंवा जे उक्त भूसम्पत्तीचे ऋणको आहेत त्या इसमांनीं आपणांस वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक म्हणून मान्यता देणें अशा इसमांस अधिक निर्धोक होण्यासाठीं, न्यायालयानें आपल्या हक्कांस यथानियम मान्यता द्यावी अशी एखाद्या वारसाची, मृत्युपत्रव्यवस्थापकाची किंवा प्रबंधकाची इच्छा असेल तर, न्यायाधिशानें, तसा अर्ज मिळाल्यावर घोषणापत्रक काढलें पाहिजे. असें घोषणापत्र परिशिष्ट अ मध्यें दिलेल्या नमुन्यानुसार असलें पाहिजे.

अर्जदाराच्या हक्कास आक्षेप घेणाऱ्या सर्व इसमांनीं घोषणापत्रकाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत न्यायालयास निवेदन करुन आपल्या हरकती नोंदवाव्यात अशी उक्त घोषणापत्रकाद्वारें त्यांना विनंती करण्यांत आली पाहिजे ; आणि पुरेशी होईल अशी हरकत घेण्यांत आली नाहीं तर, न्यायाधीश अर्जदाराच्या हक्कासंबंधीं पुरावा घेण्याच्या कामास लागेल आणि त्याची खात्री झाली तर, तो अर्जदार वारस असल्याबद्दल, मृत्युपत्रव्यवस्थापक असल्याबद्दल किंवा प्रबंधक असल्याबद्दल त्यास प्रमाणपत्र देईल असेंहि उक्त घोषणोपत्रकाद्वारें जाहीर केलें पाहिजे.

*घोषणापत्रकास प्रसिद्धि देणें.*

२-दोन ही कंडिका सन १८७३ चा अधिनियम १२ याअन्वयें रद्द करण्यांत आली.

*हरकत न घेण्यांत आल्यास मान्यता देणें.*

३. घोषणापत्रकांत उल्लेख केलेली मुदत संपेल त्यावेळीं, पुरेशी होईल अशी कोणतीहि हरकत घेण्यांत आली नसेल तर, न्यायालयानें दावा सांगणाऱ्या इसमाच्या हक्कासंबंधीं देण्यांत येईल तो पुरावा ताबडतोब स्वीकारला पाहिजे आणि त्याची खात्री झाली तर, तो इसम मृत इसमाचा मान्यता दिलेला वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक असल्याचें जाहीर करणारें प्रमाणपत्र त्यास दिलें पाहिजे. असें प्रमाणपत्र परिशिष्ट ब मध्यें दिलेल्या नमुन्यानुसार असलें पाहिजे.

*जी कोणतीहि हरकत घेण्यांत येईल तिची तपासणी करणें आणि त्याप्रमाणें मान्यता देणें किंवा नाकारणें.*

४-एक.—वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक म्हणून दावा सांगणाऱ्या इसमाच्या हक्कास (घोषणापत्रकांत उल्लेख केलेली मुदत संपण्यापूर्वी एखादी हरकत घेण्यांत आल्यास, न्यायाधिशानें एक दिवस नेमला पाहिजे. अशा दिवसाबद्दल निदान आठ दिवसांची आगाऊ नोटीस पक्षकारांस देण्यांत आली पाहिजे.) आणि अशा दिवशीं न्यायाधिशानें, एकापक्षीं हरकती ज्या आधारांवर घेण्यांत आल्या असतील त्यांची संक्षिप्त चौकशी केली पाहिजे आणि दुसऱ्यापक्षीं ज्याबद्दल दावा सांगण्यांत आला आहे त्या हक्कासंबंधीं संक्षिप्त चौकशी केली पाहिजे. तसेंच पक्षकारांकडून हजर करण्यांत येतील अशा साक्षीदारांची किंवा अशा इतर पुराव्यांची तपासणी केली पाहिजे. तसेंच, प्रकरणाच्या परिस्थितींत आवश्यक असेल त्याप्रमाणें, प्रमाणपत्र दिलें पाहिजे किंवा तें देण्याचें नाकारलें पाहिजे.

*प्रश्न गुंतागुतीचा किंवा अवघड असेल तर, बाब न्यायनिर्णयासाठीं सोंपविणें.*

४-दोन.—पक्षकारांमधील वादग्रस्त प्रश्न गुंतागुतीचा किंवा अवघड आहे असें दाखल करण्यांत आलेल्या पुराव्यावरून आढळून येईल तर, न्यायाधिशास प्रमाणपत्रासाठीं केलेल्या अर्जासंबंधींचें कामकाज स्थगित करण्याचा अधिकार आहे. अशा रीतीनें स्थगित केलेलें कामकाज, पक्षकारांपैकीं एकानें दाखल केलेल्या रीतसर दाव्यांत उक्त प्रश्नाचा न्यायनिर्णय करण्यांत येईपर्यंत स्थगित राहील.

५. कलम ४ मध्यें दिलेल्या नियमांन्वयें एखाद्या मृत्युपत्रव्यवस्थापकास यथानियम मान्यता देण्यांत येईल त्या प्रत्येक प्रसंगीं, ज्या मृत्युपत्रान्वयें त्याची नेमणूक करण्यांत आली तें मृत्युपत्र कोणतेंहि असल्यास त्याचा खरेपणा सिद्ध होईल आणि संबंधित इसम मृत्युपत्र व्यवस्थापक असल्याबद्दल त्यावर शेरा लिहून, प्रमाणपत्र देण्यांत येईल. मृत्युपत्रांच्या आणि मान्यतांच्या खरेपणाबद्दल प्रमाणपत्र कसें द्यावें.

६. [मृत्युपत्रें व मान्यता यांची नोंदणी करणें.] सन १८७३ चा अधिनियम १२ याअन्वयें रद्द केला.

७-एक. वैध वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक जीं कृत्यें करण्यास सक्षम असतात आणि जे लेख लिहून देण्यास सक्षम असतात, तीं सर्व कृत्यें करण्यास आणि सर्व लेख लिहून देण्यास, योग्य तें प्रमाणपत्र धारण करणारा वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक सक्षम असेल ; तसेंच त्याला वैध वारसांच्या, मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रबंधकाच्या नात्यानें कोणत्याहि न्यायालयांत दावा करण्याचा व निकाल मिळविण्याचा अधिकार आहे. मान्यताप्राप्त वारस इत्यादि मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सक्षम असणें.

दोन. परंतु, उक्त प्रमाणपत्रामुळें मालमत्तेवरील हक्क प्राप्त होत नाहीं, केवळ त्या त्या वेळीं मालमत्तेची विधिविहित व्यवस्था कोणाकडे आहे तें सूचित होतें आणि म्हणून, असें प्रमाणपत्र देण्यांत आल्यामुळें कोणत्याहि इसमाचे हक्क निश्चित होणार नाहींत किंवा त्यामुळें कोणत्याहि इसमांच्या हक्कांस नुकसान पोचतां कामा नये. आणि दुसऱ्या इसमास वरचढ हक्क आहे हें सिद्ध झाल्यावर, जिल्हा न्यायालयानें तें रद्द केलें पाहिजे. परंतु मान्यतेमुळें मालमत्तेवरील मालकी हक्क मिळणार नाहीं.

तीन. वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक यास कोणतेहि प्रमाणपत्र देण्यांत आलें नसतें तर, मालमत्तेंत हितसंबंध असलेल्या सर्व इसमांना तो ज्या रीतीनें जबाबदार झाला असता त्याच रीतीनें, प्रमाणपत्र धारण करणाऱ्या वारसानें, मृत्युपत्रव्यवस्थापकानें किंवा प्रबंधकानें त्या नात्यानें केलेल्या आपल्या कृत्यांबद्दल तो अशा इसमांस जबाबदार असेल. तसेंच, दावेदारांस जबाबदार असण्याच्या अटींतून मुक्तता होत नाहीं.

८. न्यायाधिशानें प्रमाणपत्र देण्यास नकार देणें हें ज्याच्या अर्जास नकार देण्यांत आला त्या इसमाच्या हक्काविषयीं अखेरचा निर्णय असणार नाहीं ; परंतु अशा इसमास आपला हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठीं दावा दाखल करतां येईल. मान्यतेस नकार म्हणजे अर्जदारांच्या दाव्या विरुद्ध निर्णय नव्हे.

## विभाग २.

### कबजा घेण्यास सक्षम असलेला आणि तसें करण्यास राजी असलेला वारस किंवा मृत्युपत्रव्यवस्थापक नसेल त्याबाबतींत, जिल्हा न्यायालयानें करावयाच्या प्रबंधकाच्या नेमणुकीविषयीं.

९. मृत इसमाच्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असलेला किंवा असा ताबा घेण्यास राजी असलेला कोणीहि इसम त्याच वेळीं नसेल आणि दोन किंवा अधिक दावेदार असून त्यांच्यामध्यें वारस हक्कासंबंधीं किंवा उत्तराधिकार मिळण्याच्या हक्कासंबंधीं वाद असेल आणि त्यांच्यापैकीं कोणीहि मालमत्तेचा कबजा घेतलेला नसेल त्या बाबतींत तेव्हां, अथवा वारस शिशु असल्यामुळें, वेडे असल्यामुळें किंवा त्यांना वारस इत्यादि होण्यास पात्र इसम असतील

परंतु वारस इत्यादि कोण त्याचा निर्णय झालेला नसेल किंवा वारस अक्षम असतील असे प्रसंग न्यायाधिशास अशा प्रसंगीं प्रबंधकाची नमणूक करतां येईल परंतु निकडीचा प्रसंग संपल्यावर, उक्त प्रबंधक जबाबदार असेल.

इतर अपात्रता प्राप्त झालेली असल्यामुळें आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्यास ते अक्षम असतील आणि त्यांच्या वतीनें मालमत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार असलेले आणि तो घेण्यास राजी असलेले कोणीहि जवळचे नातेवाईक त्यांना नसतील ; तेव्हां, उक्त मालमत्ता ज्याच्या अधिकारक्षेत्रांत असेल त्या न्यायाधिशास मालमत्तेची व्यवस्था पाहण्यासाठीं प्रबंधक नेमण्याचा अधिकार आहे. असा प्रबंधक हा यथास्थिति, वैध वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा वैध प्रबंधक आढळून येईल तोपर्यंतच किंवा वारसा हक्काविषयीं किंवा उत्तराधिकारे मिळण्याविषयीं निर्णय होईपर्यंतच किंवा वारसास प्राप्त झालेली अपात्रता दूर होईपर्यंतच नेमला जाईल. उपरोक्त गोष्टी घडून येतील त्याप्रसंगीं, उक्त गोष्टीसंबंधी न्यायाधिशाची खात्री पटल्यावर त्यानें, मालमत्ता अशा इसमाच्या स्वाधीन करावी असा निदेश उक्त मालमत्ता ज्याच्या ताब्यांत आहे त्या प्रबंधकास दिला पाहिजे ; तसेंच प्रबंधकानें आपल्या प्रबंधक म्हणून काम करण्याच्या मुदतींत मिळालेल्या सर्व जमा रकमा आणि दिलेल्या सर्व खर्चाच्या रकमा यांचा संपूर्ण हिशोब त्यासोबत दिला पाहिजे असाहि निदेश त्यास दिला पाहिजे.

वारस इत्यादि हे माहीत नसतील तर प्रबंधकांची नेमणूक करण्यांत यावी व घोषणा-पत्रक काढण्यांत व प्रसिद्ध करण्यांत यावें.

१०-एक. एखादा इसम मागें मालमत्ता ठेवून मृत्युपत्र न करतां मरण पावला असेल आणि त्याच्या वारसांविषयीं माहिती मिळत नसेल त्या प्रत्येक प्रसंगीं, ज्या न्यायाधिशाच्या अधिकारक्षेत्रांत उक्त मालमत्ता असेल त्यानें, मालमत्तेची व्यवस्था पाहण्यासाठीं प्रबंधक नेमला पाहिजे. तसेंच मृत इसमाच्या वारसानें किंवा उक्त मालमत्तेचा ताबा मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याहि इसमानें हजर राहून आपला दावा निवेदन करावा असें, उक्त वारसास उद्देशून असलेलें घोषणापत्रक न्यायाधिशानें काढलें पाहिजे. असें घोषणापत्रक परिशिष्ट क मध्यें दिलेल्या नमुन्यानुसार असलें पाहिजे.

दोन. घोषणापत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें पाहिजे आणि मृत इसम न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रांच्या हद्दीं बाहेरील कोणत्याहि जिल्ह्याचा किंवा प्रदेशाचा रहिवासी असेल तर, आणि मालमत्ता १,००० रु. किंमतीची किंवा त्याहून जास्त किंमतीची असेल तर, घोषणापत्रक राजपत्रांत प्रसिद्ध केलें पाहिजे.

वारस इत्यादि म्हणून आढळून येणाऱ्या इसमांना कबजा देणें.

तीन. कोणताहि इसम वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक म्हणून किंवा इतर कोणताहि इसम म्हणून हजर होईल आणि वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक म्हणून किंवा इतर इसम म्हणून संपूर्ण मालमत्तेचा किंवा तिच्या कोणत्याहि भागाचा कबजा मिळण्याविषयीं त्यास असलेल्या हक्काविषयीं न्यायाधिशाची खात्री पटवून देईल तर, व्यवस्था पाहण्यासाठीं झालेला आवश्यक तो खर्च वजा केल्यानंतर मालमत्ता त्याच्या स्वाधीन करण्यांत आली पाहिजे.

कोणीहि वारस हजर न झाल्यास, प्रकरण सदर

चार. परंतु, कोणत्याहि वारसानें हजर होऊन आपला हक्क प्रस्थापित करून घेतला नाहीं तर, प्रकरणाच्या परिस्थितीविषयीं सदर दिवाणी अदालतीकडे प्रतिवृत्त पाठविले पाहिजे. असें प्रतिवृत्त प्रबंधकाच्या नेमणुकीनंतर बारा महिने पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या लगत पुढील डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस पाठविले पाहिजे आणि त्यासोबत मालमत्तेची यादी व मूल्यमापन असलें पाहिजे. सदर दिवाणी अदालतीस

मालमत्ता आणखी कांहीं काळ प्रबंधकाच्या व्यवस्थेखालीं राहावी किंवा न्यायालयानें दिलेल्या अधिकारांन्वयें त्यानें ती विकून टाकावी आणि सर्व संबंधित इसमांच्या अंतिम फायद्यासाठीं, विक्रीचें उत्पन्न सरकारी खजिन्यांत ठेवावें असा निदेश देतां येईल व त्यानें तसें करणें हें विधिसंमत असेल.

दिवाणी अदालतीकडे पाठविणें, अदालतीनें मुदत देणें किंवा विक्री करण्याविषयीं विक्रीचें उत्पन्न अनामत ठेवण्याविषयीं आदेश देणें.

११. या विनियमाच्या ९ व्या व १० व्या कलमाअन्वयें न्यायाधिशानें प्रबंधक नेमलेला असेल त्या-प्रसंगीं, त्यानें आपल्या पदाचीं कर्तव्यें पार पाडण्यापूर्वीं, त्याच्याकडे सोंपविलेलीं कामें निष्ठापूर्वक पार पाडण्यासाठीं तारण दिलें पाहिजे. अशा तारणाची रक्कम न्यायाधिशानें ठरवावयाची असेल. अशा प्रबंधकास, त्याच्या परिश्रमांबद्दल न्यायाधीश ठरवील तें पारिश्रमिक मिळण्याचा अधिकार असेल परंतु, हितसंबंध असलेल्या कोणत्याहि इसमानें सदर दिवाणी अदालतीकडे तक्रार केली तर, सदर दिवाणी अदालतीस उक्त पारिश्रमिकांत फेरबदल करतां येईल.

न्यायालयानें नेमलेल्या प्रबंधकांनीं तारण देणें. न्याया-धिशाच्या स्वविवेका-नुसार, त्यांना पारिश्रमिक देणें.

---

## परिशिष्ट अ.

### एखाद्या मृत इसमाचा वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक म्हणून मान्यता मिळण्यासाठीं एखाद्या इसमानें अर्ज केला असतां काढावयाच्या घोषणापत्रकाचा नमुना.

### घोषणापत्रक.

.................... जिल्ह्याच्या न्यायालयांत.

ज्याअर्थी, अ ब, राहणार .............................. हा ................ येथें ........................ सन ................ रोजीं किंवा त्या सुमारास मरण पावला आणि ज्याअर्थी, क ख, राहणार ......................., यानें उक्त अ ब चा वारस [किंवा यथास्थिति मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक] म्हणून स्वतःस यथा नियम मान्यता मिळण्यासाठीं उक्त जिल्ह्याच्या न्यायाधिशाकडे अर्ज सादर केलेला आहे, त्याअर्थी ; उक्त अ ब चा वारस [किंवा यथास्थिति मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक] म्हणून उक्त क ड यास असलेल्या हक्कास आक्षेप घेण्याचा अधिकार असलेल्या सर्व इसमांनीं आपल्या हरकती उक्त जिल्ह्याच्या न्यायालयांत दाखल कराव्या आणि त्यासाठीं, या घोषणापत्रकाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत उक्त जिल्ह्याच्या न्यायालयांत, हजर राहावें, अशी या घोषणापत्रकान्वयें उक्त इसमांस नोटीस देण्यांत येत आहे. त्याच-प्रमाणें, उक्त एक महिन्याची मुदत संपण्यापूर्वीं पुरेशी होईल अशी हरकत घेण्यांत न आली तर, उक्त न्यायाधीश तावडतोब उक्त क ड च्या हक्काविषयीं पुरावा घेण्याच्या कामास लागेल. आणि उक्त मृत इसम अ ब याचा वारस [किंवा यथास्थिति मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक] असल्याबद्दल प्रमाणपत्र मिळण्याचा उक्त क ड यास हक्क आहे असें आढळून आल्यास, त्यास तसें प्रमाणपत्र देण्याच्या कामास लागेल.

.............. येथें ...................... सन ...................... रोजीं.

न्यायाधीश
वरिष्ठ सहाय्यक न्यायाधीश
किंवा
कनिष्ठ सहाय्यक न्यायाधीश
} याची सही.

## परिशिष्ट ब.

### एखाद्या मृत इसमाच्या मान्य वारसास, मृत्युपत्रव्यवस्थापकास किंवा प्रबंधकास द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना.

.............. जिल्ह्याच्या न्यायालयांत

ज्याअर्थी, अ ब, राहणार .................... हा .................. येथें .................. सन .................. रोजीं किंवा त्या सुमारास मरण पावला आणि ज्याअर्थी ; क ख, राहणार .................. यानें उक्त अ ब चा वारस [किंवा यथास्थिति मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक] म्हणून स्वतःस यथानियम मान्यता मिळण्यासाठीं अर्ज केला होता, तसेंच ज्याअर्थी, नेहमीचें घोषणापत्रक काढण्यांत आलें होतें आणि उक्त क ड याच्या हक्कास पुरेशी होईल अशी हरकत घेण्यांत आली नाहीं आणि ज्याअर्थी, उक्त अ ब चा वारस [किंवा यथास्थिति मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रबंधक] म्हणून मान्यता मिळण्याच्या स्वतःच्या हक्का-विषयीं न्यायालयाची खात्री होईल असा पुरावा उक्त क ड यानें त्यानंतर दिलेला आहे ;

त्याअर्थी; उक्त क ड हा उक्त मृत इसम अ ब याचा मान्यताप्राप्त वारस [किंवा मृत्युपत्र-व्यवस्थापक किंवा प्रबंधक] आहे असें या द्वारें प्रमाणपत्र देण्यांत येत आहे.

.................. येथें .................. सन .................. रोजीं.

न्यायाधीश<br>वरिष्ठ सहाय्यक न्यायाधीश<br>किंवा<br>कनिष्ठ सहाय्यक न्यायाधीश } याची सही.

## परिशिष्ट क.

### एखादा इसम मृत्युपत्र न करतां, मागे मालमत्ता ठेवून मरण पावेल आणि त्याच्या वारसांविषयी माहिती नसेल तेव्हां काढावयाच्या घोषणापत्रकाचा नमुना.

### घोषणापत्रक.

.................. जिल्ह्याच्या न्यायालयांत

ज्याअर्थी, अ ब, राहणार .................... हा .................. येथें .................. सन .................. रोजीं किंवा त्या सुमारास मरण पावला आणि त्यानें आपल्यामागें उक्त जिल्ह्यांत .................. येथें पुढील मालमत्ता ठेवली आहे. [येथें मालमत्ता निर्दिष्ट करा]; आणि ज्याअर्थी, उक्त अ ब यानें कोणतेंहि मृत्युपत्र केल्याचे आढळत नाहीं तसेंच त्यास वारस आहेत किंवा नाहींत याचीहि माहिती मिळत नाहीं ; त्याअर्थी, वारस असल्याचा दावा सांगणाऱ्या किंवा उक्त मालमत्तेचा ताबा मिळण्याचा स्वतःस हक्क आहे असा दावा सांगणाऱ्या इसमांचा दावा सिद्ध झाल्यावर, उक्त मालमत्ता त्यांच्या स्वाधीन करणें शक्य होईल. त्यासाठीं अशा सर्व इसमांनीं उक्त न्यायालयांत हजर राहावें आणि आपल्या दाव्या विषयीं निवेदन करावें अशी त्यांना याद्वारें नोटीस देण्यांत येत आहे.

.................. येथें .................. सन .................. रोजीं

न्यायाधीश<br>वरिष्ठ सहाय्यक न्यायाधीश<br>किंवा<br>कनिष्ठ सहाय्यक न्यायाधीश } याची सही.